क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शायन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगष्ट १६२३ - द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालीत विद्यापीठ)

डॉ. शरद सुर्यवंशी
संचालक

आर.बी.डी. लक्ष्मीनरायन परिसर,
रवि नगर, अमरावती रोड, नागपूर

दुरध्वनी क्रमांक ०७१२—२५३१६९६ / ९८५०३०३१५४, E-mail : departnmu@yahoo.in

जावक क्र. क्रीशाशिवि/अं.महा.स्पर्धा/२०२१-२२/८३० दिनांक : २६/०२/२०२२

प्रति,

मा. प्राचार्य/ विभाग प्रमुख
सर्व संचालित व संलग्नीत महाविद्यालये आणि पदव्युत्तर शैक्षणिक विभाग
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
नागपूर.

**विषयः आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा/निवड चाचणी; 2021-22**
महाविद्यालयाची माहीती सादर करणे बाबत.

कोव्हीड-19 च्या प्रार्दुभावामुळे स्थगीत झालेल्या वर्ष 2021-22 मधील आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धांना पुन्हा प्रारंभ होतो आहे. सदर स्पर्धेत सहभागी होणा-या विद्यापीठ संघाचे निवडीसाठी विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे वतीने सोबत जोडलेल्या प्रमाणे स्पर्धा/थेट निवड चाचण्यांचे आयोजन करण्याचे योजीले आहे. कोव्हीड-19 चे प्रार्दुभावामुळे निर्माण झालेल्या अनिश्चित वातावरणामुळे काही खेळांच्या थेट निवड चाचण्या यशाशिघ्र आयोजीत करणे क्रमप्राप्त झाले आहे. तसेच स्पर्धा आयोजन करने, मैदान तयार करणे आणि स्पर्धा आयोजना संबंधी प्रस्ताव सादर करण्या करिता महाविद्यालयास अतिशय अल्प कालावधी शिल्लक राहाला आहे.

या अनुषंगाने विद्यापीठाच्या आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांचे/निवड चाचणीचे आयोजन करण्यात येत आहे. ज्या खेळांच्या आंतर महाविद्यालयीन स्पर्धां आयोजीत करण्यात आल्यात, त्या खेळांचे प्रवेश शुल्क महाविद्यालयांनी क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागात श्री. सुनील गावंडे यांचेकडे रोखीने किंवा धनाकर्षा (D.D.) द्वारे जमा करावेत.

याशिवाय शैक्षणिक सत्र 2019-20 वर्षापासुन नव्याने सुरू करण्यात आलेल्या खेळांची माहीती सोबत जोडलेल्या प्रपत्र 'अ' प्रमाणे 4 मार्च 2022 रोजी दुपारी 4.00 वाजे पर्यंत विभागास महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षक व प्राचार्य या दोघांचे स्वाक्षरीनिशी departnmu@yahoo.in यावर मेल करावी, यानंतर येणारी माहीती स्विकारली जाणार नाही.

करिता, सहकार्य करावे, हि विनंती.

संलग्न : प्रपत्र 'अ'

डॉ. शरद सुर्यवंशी
संचालक
क्रीडा व शारीरिक शिक्षण

**प्रतिलीपीः**

१) मा. डॉ. सुभाष चौधरी, कुलगुरू राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) मा. डॉ. राजु हिवसे कुलसचिव राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.
३) श्री. सुनील गावंडे (ए.वे.क.) क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांनी अनुषंगीक कार्यवाही घ्यावी.